ISSN: 2347-2723 IMPACT FACTOR : 2.0260(UIF) VOLUME - 4 | ISSUE - 10 | MAY - 2017

REVIEW OF LITERATURE

# दहशतवाद उदय आणि विकास

प्रा. पांडुरंग मा. नवल
सहाय्यक प्राध्यापक, राज्यशास्त्र विभाग,
स्वामी विवेकानंद वरीष्ठ महाविद्यालय, मंठा.

## प्रस्तावना

अवघे विश्वची माझे घर या उक्ती प्रमाणे जगात शांती चे पर्व सुरू झाले परंतू माहिती तंत्रज्ञानाच्या जोरावर राष्ट्रांमध्ये शस्त्रास्त्र स्पर्धा सुरू झाल्या यामुळे जगातील शांती टिकुन राहणे कठीण बनले. एकविसाव्या शतकात आधुनिक तंत्रज्ञानाने संपुर्ण विश्व मोबाईल, इंटरनेट, इमेल द्वारे संपर्क करणे सुलभ झाल्याने जग जवळजवळ येत असतांना स्पर्धात्मक वर्चस्वासाठी शत्रु मध्ये वाढ होऊन बदला घेण्याची वृत्ती राष्ट्रांमध्ये निर्माण झाली विसाव्या शतकात अनेक महत्वपूर्ण घडामोडी घडल्या प्रामुख्याने विचार करता मानवाचा विकास होत असतां जसजसा विकास होत होता तसा विनाशाची दारेही उघडल्या जात होती. विशेषतः दुसऱ्या महायुध्दानंतर म्हणजेच 20 व्या शतकानंतर विश्वामध्ये अनेक महत्वपुर्ण घटना घडल्या आंतरराष्ट्रीय पातळीवर राजकारण साधारणतः 1954 नंतर जगात दोन महासत्ता उदयाला आल्या रशिया व अमेरिका हे दोघे देश जगात शक्तिशाली म्हणून ओळखले जाऊ लागले तत्कालीन देशांमध्ये युरोप वगळता कुठेही आधुनिकता व विकास फारसा जाणवत नव्हता परंतु जपान, चीन, फ्रान्स, इंग्लंड, जर्मनी, अमेरिका, रशिया प्रमुख देश जगावर राज्य करीत होते परंतु दुसऱ्या महायुध्दानंतर जपानचा हिरोशिमा आणि नागासाकी या शहरावर अमेरिकेने अनुबॉम्ब टाकत पराभव केला मोठया प्रमाणामध्ये जीवितहानी झाली आणि दुसऱ्या महायुध्दाचा शेवट झाला.

## उद्दिष्टे :—

1) दहशतवाद म्हणजे काय ते अभ्यासणे
2) भारतीय दहशतवादाचा अभ्यास करणे
3) पंजाब मधील दहशतवादाचे स्वरूप स्पष्ट करणे
4) जनसंपर्क माध्यमावर हया दहशतवादाचा झालेला परिणाम
5) दहशतवादावरील उपाय योजना

## दहशतवाद म्हणजे काय :—

दहशतवाद म्हणजे जनतेसोबत व मालमत्तेबाबत आक्रमकतेचा हिंसाचाराचा उपयोग करून सरकारी यंत्रणेस व इतर काही औपचारिक संस्थांना विशिष्ट राजकीय धार्मिक व सामाजिक उद्दिष्टे पुर्ण करण्यास भाग पाडणे.

दहशतवाद म्हणजे एक प्रकारे सामान्य लोकांची व त्यांच्या मालमत्तेची ढाल करून औपचारिक व सरकारी यंत्रणेकडुन काही विशिष्ट उद्दिष्ट प्राप्त करण्यास या



हेतुने पण सामाजिक संदर्भानुसार व्यवहारांमध्ये दहशतवादाचा अर्थ बदलतो आहे त्यामुळे दहशतवादी आणि स्वातंत्र्यवीर यामध्ये भेद करणे कठीण होत आहे. काही वेळा मुलांना पळुन नेणे, सरकारी अधिकाऱ्यांचा खुन करणे, विमान अपहरण करणे, बॅंका लुटणे, सरकारी मालमत्तेचे नुकसान करणे, अतिमहत्वाच्या व्यक्तींना किडन्याप करणे इत्यादी सारख्या वर्तन प्रकारचा दहशतवादी या वर्तनामध्ये समावेश होतो.

दहशतवादाच्या माध्यमातून व्यक्तींचा किंवा काही गटांचा आदर्शवाद वांशिक प्रेम या धार्मिक प्रेम व्यक्त होत असते. उदाहरणार्थ काश्मीर पंजाब इत्यादी सरकारी यंत्रणेचे राजकीय धोरण बदलण्यासाठी दहशतवादी वर्तनाचा साधन म्हणून उपयोग केला जातो. आज भारतात अनेक दहशतवादी संघटना आपल्या विचारांचा व उद्देश यांचा प्रचार व्हावा जनतेची लक्ष त्यांच्याकडे केंद्रीत व्हावे यासाठी वेगवेगळया मार्गांचा अवलंब केला जात आहे.

## भारतातील दहशतवाद :–

ब्रिटिशांच्या अंमला खालुन 15 ऑगस्ट 1947 रोजी भारताला स्वातंत्र्य मिळाले आणि भारत हे एक सार्वभौम प्रजासत्ताक धर्मनिरपेक्ष लोकशाही मानणारे राष्ट्र म्हणुन उदयास आले. स्वातंत्र्यपुर्व काळात अनेक परकीय राष्ट्रांनी भारतावर आक्रमण करून भारतातील संपत्ती लुटण्याचा प्रयत्न केला भारतावर कायमस्वरूपी राज्य करण्याची मानसिकता या लोकांची होती हा ही राजकीय दहशतवाद म्हणता येईल स्वातंत्र्योत्तर काळात सुध्दा दहशतवाद वाढतच गेला याला मुख्य कारण म्हणजे धार्मिक मुलतत्ववाद आज भारताकडे सर्वजण शांतताप्रिय राष्ट्र म्हणुन बघत आहे. परंतु काही शत्रु राष्ट्रांचा भारतातील शांतता सहन किंवा भारतीय शांतता भंग करण्याकडे लक्ष आहे. म्हणुन शत्रु राष्ट्र सतत भारतात अशांतता पसरवण्यासाठी अनेक कृत्य करत आहेत. त्यासाठी भाडोत्री दहशतवादी भारतात येऊन पाठवून दहशतवादी कारवाया करीत आहेत. याचे मुख्य कारण म्हणजे मुंबई वरील 26/11 चा हल्ला व तेथे घडवुन आणलेले बॉम्बस्फोट, तसेच सध्या मोठया राजकीय नेत्यांची घडवुन आणलेली हत्या उदाहरणार्थ इंदीरा गांधी, राजीव गांधी व महात्मा गांधी, नरेंद्र दाभोळकर, कॉम्ब्रेड पानसरे यांची केलेली हत्या, कश्मीर मधील दहशतवादी परिस्थिती सर्वश्रुत आहे.

## कश्मीर प्रश्न :–

काश्मीरचा प्रश्न तर सर्वश्रुत आहे भारतीय घटनेनुसार कश्मीरला एक स्वतंत्र दर्जा दिला आहे. इतर राज्यापेक्षा त्याला वेगळी वागणुक दिली जात आहे याचा परिणाम म्हणजे त्या राज्यातील दोन प्रमुख भौगोलिक विभागात तेढ निर्माण झाली आहे. काही राजकीय पक्ष या मुद्दयाला खतपाणी घालत आहेत शिवाय शेजारील राष्ट्र तेथील मुस्लिम बांधवांना उत्तेजन देऊन हिंसाचार करण्यास प्रवृत्त करत आहे असा आरोप केला जातो. त्यामुळे पाकिस्तानला अनुकुल असणाऱ्या लोकांची संख्या वाढत आहे त्यांनी या सर्व परिस्थितीचा फायदा घेवुन बंडखोरी वर्तनाला सुरुवात केली जाळपोळ बॉम्बस्फोट, हिंदु पंडितांच्या हत्या यामार्फत संपुर्ण कश्मीरमध्ये दहशतवाद निर्माण झाला आहे. गुजरात सारख्या राज्यामध्ये राखीव जागांचे निमित्त करुन दंगली घडवून आणल्या जात आहेत. तसेच मारामाऱ्या जाळपोळ इतर प्रकार घडुन आणले जाते. त्यामुळे अनेक ठिकाणी संचारबंदी लागु करण्यात आली. त्यानंतर मंडल आयोगाच्या शिफारशींची अंमलबजावणी करण्यात आल्यानंतर 1990 साली तर काही विद्यार्थ्यांना आत्मदहन केले मंडल आयोगाला विरोध करणं किंवा विरोधाचे कारण दाखवून उत्तरेकडील राज्यांमध्ये दंगे घडवुन आणले गेले. 1977 ते 1979 या काळात जेव्हा जनता पक्ष प्रथमतः सत्तेवर आला त्याने श्री मंडल यांच्या नेतृत्वाखाली एक आयोगाची स्थापना केली मागासवर्गीयांसाठी घटनेमध्ये आणखी काही तरतुदी करता येती का याचा अभ्यास करुन सुयोग्य शिफारशी शासन दरबारी सादर करण्यास आयोगाला सांगण्यात आले सर्व सवलतींचा विचार करुन त्यामध्ये काही फेरबदल सुचवले मागासवर्गीयांमध्ये आणखीही काही उपजाती यांचा समावेश करण्यात आला त्याचबरोबर आणखी काही वर्षे मागासवर्गीयांसाठी राखीव जागा असाव्यात त्यांचे प्रमाण वाढवावे असे सुचविले परंतु गुणवत्तेशी तडजोड स्विकारावी लागेल प्रगत जमातींसाठी सरकारी यंत्रणेमध्ये बढती व व्यवसायासाठी संधी उपलब्ध होणार नाही अशी मुद्दे पुढे येऊ लागले याचा परिणाम जाळपोळ हिंसा यामध्ये झाला मंडल आयोगामुळे झालेल्या दंगली म्हणजेच सर्वांनी आपल्या हितसंबंधांना बाधा आणणाऱ्या सरकारी निर्णयाला दिलेले उद्रेकाची प्रतिक्रिया होय.

### पंजाब प्रश्न :–

स्वातंत्र्यपूर्व काळात भारतात लहान राज्य होती त्यावर वेगवेगळी राज्य राज्य करीत असता ब्रिटीशांनी त्या सर्वांना एकाच छताखाली आणले पण भारत सोडतांना मात्र सामील करण्याच्या बाबतीत ब्रिटीशांनी भुतपुर्व छोटया राजांना कायदेशीर पर्याय देवुन काही समस्याही निर्माण केल्या व काही प्रश्न अनुत्तरीत ठेवले त्यामधील एक समस्या म्हणजे पंजाब त्यांची स्वतंत्र राज्याची मागणी. सुरुवातीस पंजाब मधील वातावरण स्वतंत्र होण्याला अनुकुल नव्हते त्यामुळे हा प्रश्न पुढे आला नाही. परंतु शिखांनी राजकीय वेगळेपण जपण्यासाठी ब्रिटीशांनी जाणीवपुर्वक प्रयत्न केला होता राजकीय प्रवृत्तीने मात्र लहान लहान गटांमध्ये असणाऱ्या या याचा फायदा घेतला. याचा परिणाम अनेक लोक दुखण्यात झाला आणि त्याची वृत्ती स्वतंत्र होण्याचा सक्रिय असणाऱ्या गटाला अनुकुल झाले.

### जनसंपर्क माध्यमे आणि दहशतवाद :–

भारतात चित्रपट निर्मिती 1913 पासुन झाले पुर्वीचे चित्रपट हे धार्मिक सामाजिक कौटुंबिक पौराणिक कथा भोवती फिरत होती परंतु जसजसे तंत्रज्ञानामध्ये बदल होत गेले तसतसे चित्रपटाच्या कथनकामध्ये ही मोठया प्रमाणात बदल होत गेले हिंसा च्या दहशतवाद यांना पुर्वीच या चित्रपटातुन थोडयाफार प्रमाणात दाखवण्यात येत असे परंतु अलीकडे त्यात प्रचंड प्रमाणात वाढ झालेली आहे. मध्यंतरीच्या काळात व्हिडीओची संख्या वाढली होती आता संगणकांची संख्या मोबाईलची संख्या प्रचंड प्रमाणात वाढली आहे. इंटरनेट मुळे तर सर्व विश्व घरातली आहे सोशल नेटवर्किंग सारख्या साईट द्वारे विविध गोष्टींची देवाण–घेवाण अगदी क्षणात होत आहे. या सर्व बाबींद्वारे नेमके काय पाहिले जाते त्याचा मुलांच्या भावी जीवनावर काय परिणाम होतो याचा विचार पालक – शिक्षक नेते सामाजिक कार्यकर्ते राजकीय कार्यकर्ते या सर्वांनी करायला हवा पाश्चिमात्य देशांच्या मानाने भारतीय दुरदर्शन हे माध्यम बरेच अलीकडे आहे त्यामुळे हा विचार प्रकर्षाने येतो पण त्याच बाबतीत विशेष भारतीय संशोधने उपलब्ध नाहीत. परंतु पाश्चिमात्यांचे संशोधन मात्र येथे उपयोगी ठरु शकतात मुलांकडुन दुरदर्शनवरुन आक्रमक त्याचे निरीक्षण केले जाते त्याचा मुलांच्या जीवनावर काय परिणाम होतो भविष्याकालीन पिढी अधिक आक्रमक होते की काय ही भिती समाजातील अनेकांना वाटते आहे. परंतु फक्त भिती वाटुन उपयोग नाही तर त्यावर योग्य उपाययोजना वेळीच होणे आवश्यक आहे. घरातील वडीलधाऱ्यांचे वर्तन परिसरातील लोकांची शिकवण कशी आहे या सर्व गोष्टींचा परिणाम मुलांच्या मनावर होत असतो. पालकांचे वर्तनही नियमित असणे आवश्यक आहे. मुलांना समजुन घेण्याची गरज आहे. बाहेर मुले काय करतात कोणाच्या संगतीत राहतात ते बसतात कुठे उठतात कुठे आपल्यामागे त्यांची होत असलेले उद्योग या सर्व गोष्टींची शहानिशा पालकांनी करणे गरजेचे आहे.

### दहशतवाद व प्रसारमाध्यमे :–

प्रसारमाध्यमांनी दहशतवादाच्या संदर्भात बातम्या देतांना विशेषतः इलेक्ट्रॉनिक माध्यमांनी संयम बाळगला पाहिजे त्यामुळे दहशतवाद्यांना प्रोत्साहन मिळते पोलीसांचे मनोधैर्य खच्ची होईल नागरिकांच्या मनावर भितीचा पगडा निर्माण होईल अशी दृश्य टाळली पाहिजेत शेवटी दहशतवाद म्हणजे प्रपोगंडा बाय डॅड अॅड इंजोय वर्ड हे सुत्र लक्षात घेतले पाहिजे.

### दहशतवादावरील उपाय योजना :–

आज संपुर्ण जग दहशतवादाच्या सावटाखाली व ग्रस्त अशा मानसिकतेत वावरत असतांना आम्हा सर्वांनी सजग राहण्याची आवश्यकता आहे देशातील सर्व नागरिकांनी आपले व्यक्तिगत स्वार्थ न पाहता राष्ट्रीय हित जपणे आवश्यक आहे. राष्ट्राला अनुकुल अशी कृती प्रत्येकाकडुन घडली पाहिजे आर्मी, नेव्ही, एअर फोर्स, बीएसएफ, पोलीस इत्यादी संरक्षण दलातील जवान आपापली जबाबदारी जबाबदारीने पार पाडत असतात परंतु देशातील प्रत्येक नागरिकाने एक सजग सैनिक म्हणुन ही भूमिका बजावणे आवश्यक आहे. देशतील सर्व तरुणांमध्ये राष्ट्र भावना निर्माण करुन राष्ट्र भावाप्रति आत्मसमर्पण करण्याची वृत्ती राष्ट्रीय लोकांच्या माध्यमातून निर्माण करणे गरजेचे आहे. देशाच्या कानाकोपऱ्यात घडणाऱ्या छोटयातल्या छोटया घटना तिचेही माध्यमाद्वारे

प्रसारण करत असतांना उत्तरदायीत्व सांभाळले पाहिजे. विश्वातल्या सर्व राष्ट्रांनी दहशतवादा विरुध्द एकत्रित लढा करणे आज काळाची गरज आहे.

## संदर्भ ग्रंथ :–

1) दहशतवादाचा भस्मासुर, आयबीएन–लोकमत 2008
2) भारत आणि जग, प्राध्यापक रघुनाथ वराडकर
3) सेवादल पत्रिका
4) आधुनिक भारतातील सामाजिक व्यवस्था, डॉ प्रदिप आगलावे, विद्या प्रकाशन, नागपूर 1997
5) डब्ल्यु डब्ल्यु डॉट विकिपीडिया